आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२९ जुलै २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- कोणत्याही देशानं ऑपरेशन सिंदूर थांबवायला सांगितलं नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं लोकसभेत स्पष्ट प्रतिपादन

- ऑपरेशन महादेवमधून लष्करानं पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती

- पाकिस्तानच्या लष्करी तळांवर हल्ला टाळून सरकारनं राजकीय इच्छाशक्तिचा अभाव दाखवल्याची विरोधी पक्षनेत्यांची टीका

आणि

- १ ऑगस्टपासून युपीआयच्या बाबतीत नवे दिशानिर्देश लागू होणार

<><><><>

**कोणत्याही देशानं ऑपरेशन सिंदूर थांबवायला सांगितलं नसल्याचं** स्पष्ट प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत केलं. ते आज लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेला उत्तर देत होते.

***- - होल्ड प्रधानमंत्री- -***

भारताचं उद्दिष्ट पूर्ण झाल्यावर युद्धविराम करण्यात आला, मात्र विरोधक शत्रूराष्ट्राचा प्रपोगंडा पुढे चालवत आहेत, अशी टिका प्रधानमंत्र्यांनी केली.

जगातल्या कोणत्याही देशानं भारताला पाठिंबा दिला नसल्याचा विरोधकांचा आरोप मोडून काढत, जगातल्या कोणत्याच देशानं भारताला कारवाई करण्यापासून थांबवलं नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. भारताला जगातल्या सर्व देशांनी पाठिंबा दिला, मात्र सैन्यदलाला काँग्रेसने पाठिंबा दिला नाही, असा आरोप प्रधानमंत्र्यांनी केला.

पहलगाममधे झालेला हल्ला क्रूरतेची परिसीमा होती, याद्वारे भारतात दंगली घडवण्याचा कट होता, मात्र हा कट देशानं एकजूट दाखवून उधळून लावला, असं ते म्हणाले.

काँग्रेसने नेहमीच राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड केली असा आरोप त्यांनी केला. ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकव्याप्त काश्मीर परत का घेतला नाही असा प्रश्न काँग्रेस विचारते मात्र काश्मीर पाकिस्तानकडे जायला कोण जबाबदार आहे, असा प्रश्न प्रधानमंत्र्यांनी विचारला.

**<><><><>**

भारताच्या सशस्त्र दलांनी एकीकडे ऑपरेशन सिंदूरद्वारे दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना जमीनदोस्त केलं, तर दुसरीकडे लष्कर आणि सशस्त्र दलांनी ऑपरेशन महादेवद्वारे पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना संपवलं, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत सांगितलं.

**- - होल्ड - अमित शहा - -**

हे लष्कर ए तैयबाचे अ श्रेणीचे कमांडर असून पहलगाम हल्ल्यात सामील असल्याचे ठोस पुरावे तपास यंत्रणांकडे असल्याचा दावा त्यांनी केला. सशस्त्र दलांच्या या कामगिरीवर संपूर्ण देशाला अभिमान आहे, मात्र विरोधी पक्षांना मात्र याचा आनंद झालेला नाही, अशी टीका त्यांनी केली.

युद्ध का थांबवलं, असा प्रश्न विरोधकांनी विचारला . त्यावर युद्धाचे गंभीर परिणाम असतात, असं शहा म्हणाले.

**<><><><>**

पाकिस्तानच्या लष्करी तळावर हल्ला करू नका असं सांगून सरकारनं राजकीय इच्छाशक्तिचा अभाव दाखवला, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेदरम्यान केली. भारत-पाकिस्तान यांच्यात युद्धविराम घडवून आणल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २९ वेळा सांगितलं, असा दावा त्यांनी केला.

***- - होल्ड - राहुल गांधी - -***

पाकिस्तानी लष्करप्रमुखांना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आमंत्रित करतात, त्याचा निषेध सरकार करत नाही. पाकिस्तानला चीननं मदत केली, याचा उल्लेख सरकार करत नाहीत, असंही राहुल गांधी म्हणाले. पहलगाममध्ये हल्ला का आणि कसा झाला, याचं उत्तर मिळालं नाही, अशी टीका काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनी केली.

शस्त्रसंधीची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली, यावरुन समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी टीका केली.

दहशतवादाविरोधातली भारताची कठोर भूमिका जगासमोर मांडण्यासाठी पाठवलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळात देशाच्या विविध भागांमधून आलेले, विविध धर्मांचे खासदार होते, याकडे द्रमुकच्या खासदार कनिमोळी यांनी लक्ष वेधलं. देशात मात्र भाजपाकडून विभाजनवादी राजकारण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही कारवाई विस्तारासाठी नसून स्वसंरक्षणासाठी होती, देशाचं दहशतवादविरोधी कठोर धोरण यातून दिसलं, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी राज्यसभेत केलं. ऑपरेशन सिंदूरविषयी चर्चेला सुरुवात केल्यावर ते बोलत होते. पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तिन्ही सेनादल प्रमुखांची बैठक घेऊन निर्णायक कारवाई करण्याचे निर्देश दिले, असं त्यांनी सांगितलं.

पहलगाम हल्ला सुरक्षा व्यवस्थेतल्या त्रुटीमुळे झाला, याची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्र्यांनी घ्यायला हवी, असं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. सीमेवर चकमक सुरू असताना सीमेजवळच्या गावातले नागरिक मरण पावले, जखमी झाले. त्यांना चकमक सुरू होण्याआधी स्थलांतरित का केलं गेलं नाही असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**<><><><>**

काळा पैसा आणि करआकारणी कायद्यांतर्गत गेल्या १० वर्षात केंद्रसरकारनं ३५ हजार १०४ कोटी रुपयांची कर मागणी आणि दंड ठोठावला. त्यापैकी आतापर्यंत ३३८ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज राज्यसभेत ही माहिती दिली.

**<><><><>**

राष्ट्रपतींनी जाहीर केलेली पोलीस शौर्य पदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक, तसंच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदकं आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राज्यातल्या १०६ पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदारांना

समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली. गृह विभागाचे प्रधान सचीव अनुप कुमार सिंह, तसंच विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ मनोज कुमार शर्मा यांचा या अधिकाऱ्यांमध्ये समावेश होता.

यावेळी ६४ पोलीस अधिकारी आणि जवानांना पोलीस शौर्य पदक, ४ पोलीस अधिकाऱ्यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक, तर ३८ पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदके प्रदान करण्यात आली.

**<><><><>**

येत्या १ ऑगस्टपासून युपीआयद्वारे व्यवहार करण्यापूर्वी ज्यांना पैसे पाठवायचे आहे त्यांच्या बँकेचं नावंही दिसणार आहे. त्यामुळं योग्य व्यक्तीला किंवा दुकानदाराला पैसे पाठवले जात आहेत याची खात्री होईल. तसंच प्रत्येक व्यवहार झाल्यावर खात्यातली रक्कमही दिसणार आहे. याशिवाय अनेक नवीन अटी लागू करण्याचा निर्णय नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशननं घेतला आहे. त्यानुसार प्रलंबित असलेल्या व्यवहारांची माहिती दिवसातून केवळ ३ वेळा पाहता येईल. याशिवाय युपीआय ॲपमधून दिवसाला जास्तीत जास्त ५० वेळा खात्यातली रक्कम तपासता येईल. युपीआयच्या माध्यमातून ऑटो पे चे व्यवहार यापुढे केवळ ठराविक वेळांमध्येच होतील.

**<><><><>**

अमेरिका आणि चीन याच्यातल्या आर्थिक वादावर मार्ग काढण्यासाठी स्वीडनमधे स्टॉकहोम इथं आयोजित चर्चा आज पुन्हा सुरु झाली. स्टॉकहोममधे स्वीडीश प्रधानमंत्र्यांच्या कार्यालयात काल ही चर्चा सुरु झाली. दोन्ही देशांचे वरिष्ठ अधिकारी त्यात सहभागी झाले असून, अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेझंट आणि चीनचे उपप्रधानमंत्री हे लिफेंगही या बैठकीला उपस्थित आहेत. काल दोन्ही देशांच्या शिष्टमंडळांनी पाच तासापेक्षा जास्त वेळ चर्चा केली. मात्र या चर्चेबद्दल दोन्ही बाजूंनी कोणतंही निवेदन दिलेलं नाही.

**<><><><>**

वाशीम इथल्या पी एम श्री केन्द्रीय विद्यालयाच्या नव्या इमारतीचं उद्घाटन आज केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केलं. देशभरातल्या एकूण २८ नवनिर्मित शाळा आज राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. यात वाशीमच्या या शाळेचा समावेश आहे.

**//<><><><>//**